# २. कार्यकारी सारांश

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (''टाटा पॉवर'') या कंपनीची स्थापना १९१९ साली झाली. १ एप्रिल २००० रोजी टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० साली स्थापन) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापना) या दोन्ही कंपन्यांचे टाटा पॉवरमध्ये विलिनीकरण करून एक मुख्य कंपनी स्थापन करण्यात आली. या विलिनीकरणाचा परिणाम म्हणून वर उल्लेखिलेल्या दोन्ही कंपन्यांच्या परवान्यांचेही विलिनीकरण करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र सरकारकडून (जीओएम) मुंबई परवाना परिसरातील जनता आणि वितरण परवानाधारकांना मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पुरवण्यासाठी शासन निर्णय आयईए- २००१/ सीआर- १०५०९/ एनआरजी १ दि. १२ जुलै २००१ अन्वयेपरवाना देण्यात आला. त्यानंतर २० ऑगस्ट २००८ रोजी माननीय आयोगाने टाटा पॉवर- डीला परवाना देण्यासाठी विशिष्ट अटी घातल्या, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की परवान्याची मुदत १५ ऑगस्ट २०१४ पर्यंत कायम राहील.

## २.१ मुंबई परिसरातील वितरण व्यवसाय

टाटा पॉवरचा मुंबईतील पुरवठा परिसर दक्षिणेकडील कुलाब्यातून उत्तरेकडे वसई खाडीपर्यंत आणि मध्य मार्गावर विक्रोळीपर्यंत आहे. या परवाना परिसराची एकूण व्याप्ती ४८५ चौ. किलोमीटरची आहे आणि येथे सुमारे १.६५ कोटी लोकांची वस्ती आहे. यात समाविष्ट केलेल्या परिसरात एमसीजीएमचे २६ प्रभाग असून मिरा भाइंदर महापालिकेच्या प्रशासनाखालील परिसरही त्यात आहे.

पारंपरिकरित्या टाटा पॉवरकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा रेल्वे, रिफायनरी, बंदरे इत्यादींना पुरवली जात होती. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर टाटा पॉवरने औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी संकुलातील विविध विभागांना ऊर्जापुरवठा करण्यास सुरूवात केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर टाटा पॉवर मुंबई परवाना परिसरातील एका वेगळ्या पर्यावरणात काम करते. त्यांनी आपला वितरण परवाना इतर संस्था: बेस्ट आणि आर इन्फ्रा यांना दिला आहे. या पार्श्वभूमीवर टाटा पॉवरकडे दोन प्रकारचे ग्राहक आहेत असे म्हणता येईल.

१. टाटा पॉवर डी नेटवर्कचा वापर करून पुरवठा करण्यात येत असलेले ग्राहक. उदा. टाटा पॉवर ही व्हीलिंग लायसन्सी आणि सप्लाय लायसन्सी दोन्ही आहे.
२. इतर परवाना साखळ्यांचा वापर करून पुरवठा केला जात असलेले ग्राहक. उदा. टाटा पॉवर ही केवळ सप्लाय लायसन्सी आहे.

टाटा पॉवरचा वितरणाचा सध्याचा पाया हा ३,३०,००० ग्राहकांचा असून त्यातील ८५ टक्क्यांपेक्षा जास्त हा इतर वितरण परवानाधारकांच्या साखळीचा वापर करून केलेल्या वितरणाचा आहे.

मुंबईत विविध वितरण परवानादेयक काम करत असून वितरण परवाना एकाच वेळी विविध कंपन्यांना देण्यात आला आहे- दक्षिण मुंबईत टाटा पॉवर आणि बेस्ट तर टाटा पॉवर आणि आर इन्फ्रा हे मुंबई उपनगरात परवानाधारक आहे.

टाटा पॉवर- डी आणि बेस्ट यांना सामायिक असलेल्या परवाना परिसराबाबत बेस्टने माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलावर आधारित राहून सर्वोच्च न्यायालयाने टाटा पॉवर डीच्या या टाटा पॉवर डी आणि बेस्टला सामायिक असलेल्या संबंधित परवाना परिसरातील सर्व उपक्रमांना जैसे थेच्या सूचना दिल्या आहेत. या दृष्टिकोनातून पाहताना या परिसरातील ग्राहकांसाठी टाटा पॉवर डी ही वीजपुरवठा करणारी एकमेव कंपनी ठरली आहे.

याशिवाय टाटा पॉवर डी आणि आर इन्फ्रा यांना सामायिक असलेल्या परवाना परिसरासंदर्भात माननीय आयोगाने यापूर्वी आपल्या १५ ऑक्टोबर २००९ रोजी केस क्रमांक ५०/२००९मध्ये दिलेल्या आदेशांनुसार आणि टाटा पॉवर- डीच्या आर्थिक वर्ष २००७-०८, एपीआर एफवाय २००८-०९ आणि आर्थिक वर्ष २००९-१० साठी दरपत्रक निश्चितीसाठीच्या याचिकेवरील स्पष्टीकरण आदेश दि. २२ जुलै २००९ नुसार टाटा पॉवर डीला स्वत:ची वितरण साखळी तयार करण्यासाठी मोठा भांडवली खर्च करण्याऐवजी इतर वितरण परवानादेयक (आर इन्फ्रा)च्या वितरण साखळीचा वापर करून ऊर्जापुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्याची परवानगी दिली आहे.या आदेशांमुळे ग्राहकांना आर इन्फ्राऐवजी  टाटा पॉवर-डीकडून वीजपुरवठा घेणे शक्य झाले हे. येथे दोन वितरण परवाने प्रत्यक्षात आहेत. एक व्हीलिंग लायसन्सी ज्यांनी आपल्या वायर्स किंवा साखळी वापरण्यासाठी दिली आहे आणि दुसरे सप्लाय लायसन्सी जे ग्राहकांना वीजपुरवठा करतात. ही परिस्थिती भारतात प्रथमच अंमलात आणण्यात आली आहे.

तथापि आर इन्फ्राने दाखल केलेल्या एका याचिकेवर सुनावणी करताना माननीय आयोगाने केस क्रमांक १५१/ २०११ मधील आपल्या २२ ऑगस्ट २०१२ रोजीच्या आदेशांद्वारे आता निवासी वर्गातील ग्राहकांना ज्यांचा उपभोग महिन्याला ०-३०० युनिटच्या घरात आहे त्यांना कंपनी बदलण्याची परवानगी दिली आहे. इतर सर्व वर्गांतील ग्राहकांना आदेश दिल्यापासून एका वर्षाच्या कालावधीपर्यंत कंपनीबदल करण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. याशिवाय हा बदल (उदा. आर इन्फ्रा नेटवर्ककडून टाटा पॉवर- डी नेटवर्क) आत्ताच्या ग्राहकांना काही निवडक विभाग/ प्रभागांमध्येच करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या आदेशानुसार देण्यात आलेल्या सूचना खालील तक्त्यात नोंदवण्यात आल्या आहेत:

**तक्ता २-१ : २०११च्या केस १५१ मध्ये २२ ऑगस्ट २०१२ नुसार ऑर्डर प्रमाणे निर्देशांक**

| क्षेत्रे | ग्राहक वर्ग | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | परिवर्तन | | | बदल | | | थेट | | |
| | सध्याचे लागू २२.८.२०१२ पर्यंत | नवीन अर्ज | | सध्याचे लागू २२.८.२०१२ पर्यंत | नवीन अर्ज | | सध्याचे लागू २२.८.२०१२ पर्यंत | नवीन अर्ज | |
| | | निवासी (०-३००) | इतर | | निवासी (०-३००) | इतर | | निवासी (०-३००) | इतर |
| संपूर्ण मुंबई उपनगरी क्षेत्रे | √ | √ | × | × | × | × | √ | √ | √ |
| निवडक विभाग/प्रभाग | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | √ | √ | × | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

तथापि माननीय आयोगाने या आदेशाचे २६ ऑगस्ट २०१२ रोजी केस क्रमांक १६५/२०११ मध्ये टाटा पॉवर-डीच्या व्यवसाय योजनेबाबत आदेश देताना परिणाम लक्षात घेतले नाहीत आणि टाटा पॉवर-डीला मनुष्यबळाच्या गरजेत, कॅपेक्स आणि विक्री यांच्यामध्ये व्यवसाय योजना आदेशांनुसार तसेच २२ ऑगस्ट २०१२ रोजी केस क्रमांक १५१/२०११ नुसार दिलेल्या आदेशांनुसार बदल करण्याच्या सूचना दिल्या.

याबाबतीत आम्हाला हे स्पष्ट करायची इच्छा आहे की आमच्या दृष्टिकोनातून या आदेशांमुळे टाटा पॉवर-डीच्या विक्रीमध्ये फारसा फरक पडणार नाही- त्याला खालील कारणे आहेत.

१. या आदेशांनुसार घातलेली बंधने ही एका वर्षाच्या काळापुरती मर्यादित आहेत.
२. नवीन ग्राहक मिळवण्यावर बंधने घालण्यात आलेली नाही.
३. सध्याच्या ग्राहकांनी टाटा पॉवर डीच्या साखळीत प्रवेश केल्यामुळे विक्रीवर खूप मोठा परिणाम होणार नाही.

या पार्श्वभूमीवर टाटा पॉवर डीने विक्री ही बिझनेस प्लॅन आदेशात माननीय आयोगाने मान्यता दिलेली असल्याचे मानले आहे.

भांडवली खर्चाबाबत २२ ऑगस्ट २०१२ रोजी दिलेल्या आदेशांमधील सूचनांनुसार टाटा पॉवर-डीने माननीय आयोगाकडे एक वितरण साखळी तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भांडवली खर्चाची माहिती सादर केली आहे. तथापि, माननीय आयोगाने स्वीकारेल्या तत्वांनुसार असा अतिरिक्त भांडवली खर्च या याचिकेत माननीय आयोगाने विचारलेल्या डेटा गॅप क्वेरीतील प्रतिसादात नोंदवलेला मानण्यात आला आहे.

आम्हाला हे नमूद करायचे आहे की आमच्या दृष्टिकोनातून मनुष्यबळाचा परिणाम साखळी उभारण्याच्या कामाच्या खर्चात मनुष्यबळाचा परिणाम असेल आणि ते प्रत्यक्षात एक भांडवल आहे. मनुष्यबळाच्या दरात अशी वाढ झाल्यास ती या सध्या उभारणी सुरू असलेल्या साखळीच्या भांडवली खर्चात वाढ असेल आणि अशा परिस्थितीत वितरण व्यवसायाच्या चालू खर्चावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही.

## २.२ एमवायटी नियमन २०११ अंतर्गत सादरीकरणे

माननीय आयोगाने ४ फेब्रुवारी २०११ रोजी एमवायटी रेग्युलेशन जारी केले. या एमवायटी रेग्युलेशनच्या उतारा क्रमांक ७.१ नुसार टाटा पॉवर-डीसारख्या एका वितरण कंपनीला १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीतील नियंत्रणातील आर्थिक वर्षांसाठी एक व्यवसाय योजना सादर करणे आवश्यक आहे. माननीय आयोगाने टाटा पॉवरने अशी व्यवसाय योजना सादर केली आहे. माननीय आयोगाने २६ ऑगस्ट २०१२ रोजी (बिझनेस प्लॅन ऑर्डर)साठी एक आदेश पारित केला आहे. त्यात त्यांनी टाटा पॉवरला आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीसाठी एमवायटी याचिका, व्यवसाय योजना एक पार्श्वभूमी म्हणून दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०११-१२ साठी एमईआरसी (दरांसाठी अटी आणि शर्ती) नियमन २००५ (टॅरिफ रेग्युलेशन्स २००५) अंतर्गत एआरआर याचिका दाखल करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

## २.३ एआरआर/एमवायटी- दुसरा नियंत्रण कालावधी- आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी

या विभागात टाटा पॉवरने दुसऱ्या नियंत्रण काळातील विविध वर्षांसाठी आवश्यक असलेला एकूण महसूल दाखल केला आहे. माननीय आयोगाच्या सूचनांनुसार आर्थिक वर्ष २०११-१२च्या एआरआर एमईआरसी टॅरिफ रेग्युलेशन्स २००५ नुसार काढण्यात आला असून उर्वरित चार वर्षांचा एआरआर उदा. आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ एमवायटी नियमन २०११ नुसार तसेच माननीय आयोगाने आपल्या २६ ऑगस्ट २०१२ रोजी दिलेल्या आदेशांनुसार काढण्यात आला आहे. वायर व्यवसायासाठीचा आणि वितरण व्यवसायासाठीचा एआरआर वेगळा काढण्यात आला असून अध्याय ५ ते ८ मध्ये ते सादर करण्यात आले आहेत.

याशिवाय माननीय आयोगाने आपल्या व्यवसाय योजना मान्यतेत केवळ त्याच योजनांच्या भांडवलीकरणाचा विचार केला आहे ज्यांना मुद्दलात मान्यता देण्यात आली आहे. आम्ही व्यवसाय योजनेतील केवळ मान्य केलेल्या भांडवलीकरणाबाबत हे सादरीकरण करत आहोत.

आर्थिक वर्ष २०११-१२ संपलेले असून टाटा पॉवर-डी ही वार्षिक महसूल गरज याचिका आर्थिक वर्ष २०११-१२च्या वितरण कार्यासाठी प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित राहून दाखल करत आहे. त्याचप्रमाणे आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ तील आर्थिक व्यवहारांमध्ये सुधारणा करण्यात आली असून (व्यवसाय योजना आदेशात दिलेल्या रकमेनुसार) त्यात आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची प्रत्यक्ष कामगिरी आणण्यात आली आहे.

टाटा पॉवर डीने ऊर्जा अपीलीय प्राधिकरणाकडे एमईआरसी नियमन २००५ प्रमाणे कामगिरी सादर करण्याच्या सूचनेविरोधात अपील दाखल केले आहे. टाटा पॉवर डीने माननीय एटीईच्या निर्णयावर आधारित राहून किमतीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

टाटा पॉवर डीने एक याचिका दाखल केली असून त्यात आर्थिक वर्ष २००९-१० साठीच्या एकूण महसूल गरजेच्या ट्रुईंगअपला मान्यता देण्याची विनंती आणि आर्थिक वर्ष २०१०-११चा वार्षिक कामगिरी अभ्यासाला परवानगी मागितली आहे. माननीय आयोगाने या विषयात १५ फेब्रुवारी २०१२ रोजी केस क्रमांक १०४/२०११ मध्ये एक आदेश पारित केला आहे. तथापि या आदेशाविरोधात टाटा पॉवरने काही विषयांमध्ये एटीईकडे अपील दाखल केले आहे. टाटा पॉवर डी-ने माननीय एटीईच्या आदेशांनुसार किमतीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
माननीय आयोगाने टाटा पॉवरड़ीला वार्षिक महसूल आवश्यकता वायर्स आणि पुरवठा व्यवसायासाठी वेगवेगळी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार टाटा पॉवर डी या याचिकेत वायर्स आणि पुरवठ्याचा एआरआर वेगवेगळा सादर करत आहे.

### २.४ वितरणाचा अंदाज- वायर्स व्यवसाय

टाटा पॉवर डी आपली वीज पुरवठ्याची गरज सुमारे २१०० किमी आणि एचटी वितरण साखळ्यांच्या माध्यमातून पूर्ण करते आणि त्या त्याच्या परवाना विभागातील विविध पारेषण स्वीकृती केंद्रांशी आणि उपकेंद्रांशी जोडलेल्या आहेत.

मान्यताप्राप्त व्यवसाय योजना दरपत्रक नियामन २००५ आणि एमवायटी नियामन २०११ विविध वर्षांच्या एआरआरची चर्चा खालील उताऱ्यांमध्ये करण्यात आली आहे.

### २.४.१ वार्षिक महसूल आवश्यकता

वितरण हा नियमित असलेला व्यवसाय आणि त्याचे दर हे किंमत अधिक दृष्टिकोनातून ठरवले जातात. तथापि, दरपत्रक निश्चित करण्यापूर्वी एक वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) वितरण परवानाधारकासाठी तपासली जाते. त्यात प्रस्तावित खर्च आणि वितरण परवानाधारकासाठी पुरेसा नफा या गोष्टींचा समावेश असतो. हा खर्च विविध शीर्षकांखाली करण्यास परवानगी देण्यात येत असली तरी त्याचा नफा वितरण परवानाधारकांना समभागावरील परतावा (आरओई)च्या पद्धतीने दिला जातो. आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचा वार्षिक महसूल गरज एमईआरसी (टॅरिफ) नियमन २००५ नुसार ठरला असून एमवायटी नियंत्रण काळासाठी (आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६) साठी एमवायटी नियमन २०११नुसार ठरला आहे. वार्षिक महसूल गरज निश्चित करण्याच्या दृष्टिकोनाची संक्षेपात माहिती खालील उताऱ्यांमध्ये देण्यात आली आहे.

### २.४.२ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण- वायर्स व्यवसाय

आर्थिक वर्ष २०११-१२ साठी टाटा पॉवरडीने प्रत्यक्ष ऑडिट केलेले भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आकड्यांचा वापर केला आहे. मान्यताप्राप्त व्यवसाय योजनेनुसार आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत भांडवली

खर्च आणि भांडवलीकरण केवळ त्याच योजनांचे करण्यास परवानगी देण्यात आले आहे ज्यांना माननीय आयोगो आपल्या व्यवसाय योजनेत मान्यता दिली आहे.

नियंत्रण काळातील विविध वर्षांचा भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालील तक्त्यात देण्यात आला आहे:

**तक्ता २-२ : भांडवली खर्च आणि भांडवलीकरण- वायर्स व्यवसाय**

(कोटी रुपये)

| तपशील | आ.व. २०११-१२ | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | | ७३७.३९ | १०७.०२ | ८१.८४ | - |
| भांडवलीकरण | १७२.९५ | ७३७.३९ | १०७.०२ | ८१.८४ | – |

भांडवली खर्चाला दोन स्त्रोतांतून वित्त मिळते. त्यात समभाग आणि दीर्घकालीन कर्ज यांचा समावेश आहे.

### २.४.३ समभागावरील परतावा

टाटा पॉवरने आर्थिक वर्ष २०११-१२ साठी समभागावरील परतावा १६ टक्के असल्याचे आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी १५.५० टक्के वायर व्यवसायात गुंतवलेल्या समभागासाठी असल्याचे नोंदवले आहे. समभागावरील परताव्याची सखोलात माहिती पान **क्रमांक ५-८८** आणि **पान क्रमांक ७-१०२** अनुक्रमे आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी देण्यात आली आहे.

### २.४.४ घसारा

नियमनात दिलेल्या दरांनुसार सरळ मार्गाने घसाऱ्याचे मोजमाप केले गेले आहे. तथापि एमवायटी नियमन २०११ नुसार एखाद्या मालमत्तेचा घसारा ७० टक्क्यांपेक्षा जास्त झाला असल्यास उर्वरित घसारायोग्य २० टक्के आयुष्य मालमत्तेच्या उपयोगी आयुष्यमानात वापरले जाते. प्रतिवर्षी विचाराधीन असलेला घसारा **पान क्रमांक ५-८२** आणि **पान क्रमांक ७-१०६** मध्ये देण्यात आला आहे.

### २.४.५ प्रतिकर्म आणि देखभाल खर्च

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचे प्रतिकर्म आणि देखभाल खर्च **पान क्रमांक ५-७८** मध्ये देण्यात आले आहेत.

एमवायटी नियंत्रण काळासाठी, ओ ॲण्ड एम खर्च नियमात्मक आधारावर घेतले जात असून ते एमवायटी नियमनातील उतारा ७८.४ मध्ये देण्यात आले आहेत. ओॲण्ड एम खर्चाचे नियम टाटा पॉवर डीच्या वायरींवरून पुरवल्या गेलेल्या ऊर्जेवर आणि टाटा पॉवर-डीच्या वायर व्यवसायाच्या सुरूवातीच्या एकूण स्थिर मालमत्तेवर (जीएफए) आधारित असून त्याची संपूर्ण माहिती **पान क्रमांक ७-१०७ वर** देण्यात आली आहे.

**२.४.६ दीर्घकालीन कर्जांवरचे व्याज**

आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये कर्जांवरील व्याज **१०.७८ टक्के** एवढे मोजण्यात आले आहे. या कर्जावरील व्याजाची सखोल माहिती **पान क्रमांक ५-८२** वर देण्यात आली आहे.

एमवायटी नियंत्रण काळासाठी कर्जावरील व्याज एमवायटी नियमनाच्या उतारा क्रमांक ३३ नुसार मोजण्यात आले आहे. एमवायटी नियंत्रण काळादरम्यान म्हणजे आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत दीर्घकालीन कर्जांवरील व्याजदर ११.१७ टक्के असल्याचे मोजण्यात आले आहे. याशिवाय एमवायटी नियमनानुसार या कर्जांच्या पुनर्परताव्याला घसाऱ्याचे स्थान देण्यात आले असून ते त्या संबंधित वर्षात मोजले जाणार आहे. दीर्घकालीन कर्जाची संपूर्ण माहिती **पान क्रमांक ७-१०३** मध्ये देण्यात आली आहे.

**२.४.७ वित्त दर**

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचे वित्तदर प्रत्यक्षात मोजले जात असून ते **पान क्रमांक ५-८७** वर सखोलात देण्यात आले आहेत.

**२.४.८ चलित भांडवलावरील व्याज**

चलित भांडवल गरज संबंधित दरपत्रक नियमनानुसार मोजण्यात आले आहेत. याशिवाय आर्थिक वर्ष २०११-१२ साठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या त्या वर्षी लागू असलेल्या पीलआरवर आधारित राहून १४.३९ टक्के व्याजदर आकारण्यात आला आहे. एमवायटी नियंत्रण काळासाठी १४.७३ टक्के व्याजदर लागू करण्यात आला आहे. तो स्टेट बँकेच्या कर्जदराच्या समकक्ष आहे. चलित भांडवलाच्या व्याजाची सखोल माहिती **पान क्रमांक ५-८५** आणि **पान क्रमांक ७-१०८** वर आर्थिक वर्ष २०११-१२ साठी आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी देण्यात आली आहे.

**२.४.९ वाईट आणि धोकादायक कर्जांसाठी तरतूद**

वाईट आणि धोकादायक कर्जांसाठीची तरतूद आर्थिक वर्ष २०११-१२ साठी प्रत्यक्षात मोजण्यात आली असून एमवायटी नियंत्रण काळासाठी ती शून्य मानण्यात आली आहे.

**२.४.१० आपत्कालीन राखीव साठ्यात योगदान**

आपत्कालीन राखीव साठ्यातील योगदान हे वैधानिक आवश्यकतेनुसार ठेवले जाते. आपत्कालीन साठ्यातील योगदान एकूण स्थिर मालमत्तेच्या बंद होणाऱ्या मूल्याच्या ०.२५ टक्के एवढे असल्याचे मानले जाते. आपत्कालीन साठ्यातील योगदानाचे सखोल मोजमाप **पान क्रमांक ५-९०** आणि **पान क्रमांक ७-१०९** वर अनुक्रमे आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी करण्यात आले आहे.

**२.४.११ नॉन टॅरिफ उत्पन्न**

नॉन टॅरिफ उत्पन्न हे एक अशा प्रकारचे उत्पन्न आहे जे परवानाधारक अशा उपक्रमांतून मिळवतो ज्या वितरण व्यवसायाला पूरक असतात. उदा. आपत्कालीन राखीव साठ्यातील गुंतवणुकीतून मिळालेले व्याज, नियमित व्यवसायातील मालमत्तेतून मिळालेले उत्पन्न, करभरणा इ. ग्राहकांवरील त्याचा बोजा कमी करण्यासाठी ते वार्षिक महसूल गरजेतून वजा केले जाते. नॉन टॅरिफ

उत्पन्नाची सखोल माहिती **पान क्रमांक ५-९१** आणि **पान क्रमांक ७-१११** अनुक्रमे आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी दिलेली आहे.

### २.४.१२ वित्त कर

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या वित्त कराची मोजणी माननीय आयोगाने आपल्या १५ फेब्रुवारी २०१२ रोजी केस क्रमांक १०४/२०११ मध्ये दिलेल्या आदेशांतील वापरलेल्या तंत्राने केली जाते. आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या वित्तकराची सखोल माहिती **पान क्रमांक ५-८९** वर देण्यात आली आहे.

एमवायटी नियंत्रण काळासाठीचा वित्तकर पुनर्परतावायोग्य असून तो वेगळा सादर करण्यात आला आहे. तथापि, एकूण महसूल गरजेसाठी त्याचे मोजणी करणे आवश्यक असते आणि व्हीलिंग दरांच्या प्रस्तावावर काम करण्यासाठी गरजेचे असते. एमवायटी नियंत्रण काळासाठीचा वित्तकर माननीय आयोगाने आपल्या व्यवसाय योजनेवरील २६ ऑगस्ट २०१२ रोजी दिलेल्या आदेशांनुसार आकारला जातो. एमवायटी नियंत्रण काळासाठीच्या वित्तकराची सखोल माहिती **पान क्रमांक ७-११२** वर देण्यात आली आहे.

### २.४.१३ एकूण महसूल गरज- वायर व्यवसाय

वार्षिक निश्चित दर टॅरिफ नियमन २००५ मधील तत्वांचा वापर करून आर्थिक वर्ष २०११-१२ साठी आणि एमवायटी नियमन २०११ आणि दिनांक २६ ऑगस्ट २०१२ रोजी १६५/२०११ मध्ये दिलेल्या दिलेल्या आदेशांनुसार केले जाते. ते खालील तक्त्यात नोंदवण्यात आले आहेत:

**तक्ता २-३ : वायर व्यवसायाच्या नियंत्रण काळासाठी - एकूण महसूल गरज**

| तपशील | आ.व.२०११-१२ | आ.व.२०१२-१३ | आ.व.२०१३-१४ | आ.व.२०१४-१५ | आ.व.२०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| समभागावरील परतावा | ३९.७९ | ५९.६८ | ७९.२९ | ८३.६६ | ८५.५४ |
| घसारा | २८.९१ | ५६.२४ | ७६.४१ | ८२.४७ | ८५.५४ |
| ओॲण्ड एम खर्च | ४४.५६ | ६१.७३ | ८४.३५ | ९५.१४ | १०६.०९ |
| दीर्घकालीन कर्जांवर व्याज | ३४.५६ | ६५.५६ | ९०.४० | ८८.९० | ८२.९६ |
| वित्तीय दर | ०.०१ | | | | |
| चलित | ५.५४ | ८.०५ | १०.४८ | ११.०६ | ११.३८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भांडवलावरील व्याज | | | | | |
| वाईट आणि धोकादायक कर्जासाठीची तरतूद | ०.३९ | - | – | - | – |
| आपत्कालीन राखीव निधीसाठी योगदान | २.१८ | ४.०२ | ४.२९ | ४.४९ | ४.४९ |
| वजा- नॉन टॅरिफ उत्पन्न | ७.७० | १९.८८ | २१.९७ | २४.२७ | २६.७९ |
| **वित्तकरापूर्वी एकूण महसूल गरज** | **१४८.२२** | **२३५.४०** | **३२३.२५** | **३४१.४५** | **३४९.२२** |
| वित्तकर | २२.८९ | २२.६२ | २२.४३ | २२.३१ | २२.३४ |
| **एकूण महसूल गरज** | **१७१.१२** | **२५८.०२** | **३४५.६८** | **३६३.७६** | **३७१.५६** |

## २.५ वितरण-पुरवठा व्यवसायासाठीचे अंदाज

वायर्स व्यवसायाप्रमाणे टाटा पॉवर डीने प्रत्यक्ष ऑडिट केलेल्या भांडवली खर्चाच्या आणि भांडवलीकरणाच्या आकडेवारीचा वापर आर्थिक वर्ष २०११-१२ साठी केला असून व्यवसाय योजना आदेशानुसार मान्यताप्राप्त भांडवली खर्च आणि भांडवलीकरण या गोष्टी आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीत रिटेल पुरवठा व्यवसायासाठी लागू करण्यात आला आहे.

### २.५.१ वार्षिक महसूल आवश्यकता

पुरवठा व्यवसायही वितरणाचाच एक भाग असून तो नियमित व्यवसाय आहे आणि खर्च अधिक दृष्टिकोनातून दरपत्रक ठरवले जाते. तथापि दरपत्रक निश्चित करण्यापूर्वी एक वार्षिक महसूल गरज (एआरआर) वितरण परवानाधारकासाठी मोजला जातो. त्यात वितरण परवानाधारकाचा खर्च आणि योग्य नफाही ग्राह्य धरला जातो. एकीकडे खर्च विविध शीर्षकांखाली ग्राह्य धरण्यात आला

असून नफा समभागावरील परतावा या शीर्षकाखाली वितरण परवानाधारकांना घेण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचे वार्षिक वितरण गरज एमईआरसी (दरपत्रक) नियमनानुसार आकारले जाते तर ते एमवायटी नियमन २०११ नुसार एमवायटी नियंत्रण काळासाठी आकारले जाते. ऊर्जा खरेदीचा खर्च हा रिटेल पुरवठा व्यवसायासाठी वार्षिक महसूल गरजेचा एक महत्त्वाचा घटक आहे. वार्षिक वितरण गरजेचे मोजमाप करण्यासाठीचा संक्षेपात दृष्टीकोन खालील उताऱ्यांमध्ये देण्यात आला आहे.

### २.५.२ ऊर्जा खरेदी खर्च- पुरवठा व्यवसाय

आर्थिक वर्ष २०११-१२ साठी विविध मार्गांनी दीर्घकालीन आणि लघुकालीन ऊर्जा टाटा पॉवर डीने खरेदी केली आहे. ते त्यांनी आपली आरपीओची गरज पूर्ण करण्यासाठी केले आहे. टाटा पॉवरडीने पवनऊर्जा आणि सौर ऊर्जेच्या माध्यमातून पुनर्निर्मितीक्षम ऊर्जाही मिळवली आहे. याशिवाय टाटा पॉवर डीने अनशेड्यूल्ड इंटरचेंज (यूआय) या माध्यमातून आर्थिक वर्ष २०११-१२ साठी ऊर्जा मिळवली आहे. वरील सर्व स्त्रोतांमधून ऊर्जा मिळवल्यानंतर टाटा पॉवरडीने आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची आपली ऊर्जा गरज भागवली आहे.

आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीच्या नियंत्रण काळात टाटा पॉवरने दीर्घकालीन ऊर्जा खरेदी कंत्राट टाटा पॉवर-जीशी करून आपली जास्तीत जास्त ऊर्जा खरेदी केली आहे. तथापि अशा दीर्घकालीन कंत्राटातील क्षमता ही दिलेल्या नियंत्रण काळातील विक्रीची वाढती गरज लक्षात घेता पूर्ण होईल अशी शक्यता नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन टाटा पॉवर डीने केस १ लिलाल मध्यमकाळासाठी/ दीर्घकाळासाठी ऊर्जा घेण्याचा प्रस्ताव दिला आहे. याशिवाय टाटा पॉवर डीने पुनर्निर्मितीक्षम स्त्रोतांशीही करार केला असून ते आरपीओ गरजा थोड्या प्रमाणात नियंत्रण कालावधीत पूर्ण करू शकतात. उर्वरित गरजेसाठी टाटा पॉवर डीने आरईसीकडून पुनर्निर्मितीक्षम ऊर्जा घेण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. याशिवाय टाटा पॉवर डीने इतर स्त्रोतांकडून ऊर्जा घेऊन आपल्या लघुकालीन गरजा पूर्ण करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

टाटा पॉवर डीने टाटा पॉवर जी कडून ऊर्जेसाठी करार केला असून त्यात युनिट ४ आणि ६च्या क्षमतांचा समावेश आहे. तथापि ऊर्जा दरांचा विचार करता (रूपये/किलोवॅट ताशी) या युनिटसाठी अपेक्षेपेक्षा जास्त आहेत आणि ऊर्जा खरेदीचा खर्च नीट करून त्याचा परिणाम असलेला दर यांचा विचार करता युनिट सहाकडून तेल आणि आरएलएनजी आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी काहीही खरेदीचा विचार केलेला नाही. याशिवाय त्यांनी युनिट क्रमांक ४ कडील (तेलावरील ) खरेदीचा नियंत्रण काळातील विविध वर्षांसाठी विचार केलेला नाही. या नियंत्रण काळामध्ये या युनिटकडून कोणत्याही प्रकारे ऊर्जा खरेदी केली जाणार नाही असे त्यातून सुचवण्यात येणार नाही. टाटा पॉवर डी कडून या युनिटकडील खरेदी परत केली जाईल. तसे करण्याची आवश्यकता असल्यास आणि पारेषणावरील कमतरता कमी करण्यासाठी ते केले जील. या युनिटमधील निर्मितीचा बदलणारा खर्च इतर ऊर्जेच्या पर्यायी खर्चापेक्षा कमी असल्यासच त्यातून वीज घेतली जाईल. तथापि टाटा पॉवर डीच्या मते टॅरिफ प्रस्तावावर काम करण्यासाठी आणि ग्राहकांचे दर विशिष्ट मर्यादेत ठेवण्यासाठी या युनिटमधून खरेदी करण्याची योजना केली जाणार नाहीआणि त्यामुळे कोणताही बदलता खर्च (ऊर्जा खर्च) या युनिटकडून विचाराधीन नाही. (युनिट ६ आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि युनिट ४ आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी). तथापि टाटा पॉवर डीसाठी या युनिटच्या निश्चित दरांचा समावेश ऊर्जा खरेदी खर्चात नोंदवण्यात आला आहे.

नियंत्रण काळातील आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या काळातील घेण्यात येणाऱ्या ऊर्जेचा आकार खाली तक्त्यात देण्यात आला असून तो आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये निरनिराळ्या स्त्रोतांकडून केलेल्या प्रत्यक्ष ऊर्जा खरेदीपेक्षा वेगळा आहे.

तक्ता २-४ : ऊर्जा खरेदी- रिटेल वितरण व्यवसाय

| ऊर्जा खरेदी स्त्रोत | | आ.व.२०११-१२ | आ.व.२०१२-१३ | आ.व.२०१३-१४ | आ.व.२०१४-१५ | आ.व.२०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| **टाटा पॉवर-डीची आवश्यकता** | **एमयूज** | ६,१२४.८४ | ६,६०६.९७ | ६,९९६.९२ | ७,४०२.२२ | ७,८२३.४१ |
| कुठून पुरवली | एमयूज | | | | | |
| टाटा पॉवर-जी | एमयूज | ४,९४७.४१ | ५,०८२.६१ | ३,९९६.९९ | ४,३०७.८० | ५,७३८.०५ |
| पुनर्निर्मितीक्षम स्त्रोत | एमयूज | २३१.०६ | ५२८.५६ | ६२९.७२ | ६६६.२० | ७०४.११ |
| केस -१ लिलाव | एमयूज | - | ८३०.३८ | ८३०.३८ | ८३०.३८ | ८३०.३८ |
| पूल पर्चेस | एमयूज | ५९९.४५ | - | - | - | - |
| उभयपार्श्वी खरेदी | एमयूज | ३२७.६२ | १६५.४३ | १,५३९.८३ | १,५९७.८४ | ५५०.८८ |
| आपत्कालीन स्थितीतील ऊर्जा | एमयूज | २९.६७ | - | - | - | - |
| परवानाबाह्य परिसरात विक्री | एमयूज | (१०.३८) | - | - | - | - |
| **एकूण** | **एमयूज** | ६,१२४.८४ | ६,६०६.९७ | ६,९९६.९२ | ७,४०२.२२ | ७,८२३.४१ |
| **ऊर्जा खरेदी खर्च** | | | | | | |
| टाटा पॉवर-जी | कोटी रु. | २,४१३.८८ | २,९७९.२२ | २,०२२.२५ | २,१६८.९१ | २,८१९.३४ |
| पुनर्निर्मितीक्षम स्त्रोत | कोटी | १५२.५५ | २४३.४५ | ३०९.४० | ३३२.३६ | ३५७.२६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | | | | | |
| केस -१ लिलाव | | - | ३७३.६७ | ३७३.६७ | ३७३.६७ | ३७३.६७ |
| पूल पर्चेस | कोटी रु. | ३०७.८८ | - | - | - | - |
| उभयपाश्र्वी खरेदी | कोटी रु. | १६०.३२ | ७४.४४ | ६९२.९२ | ७१९.०३ | २४७.८९ |
| आपत्कालीन स्थितीतील ऊर्जा | कोटी रु. | १४.१२ | - | - | - | - |
| परवानाबाह्य परिसरात विक्री | कोटी रु. | (३.७५) | - | - | - | - |
| **एकूण** | **कोटी रु.** | **३,०४४.९९** | **३,६७०.७८** | **३,३९८.२५** | **३,५९३.९७** | **३,७९८.१६** |
| स्टँडबाय देय दर | कोटी रु. | ८४.३१ | १४०.५० | १४०.५० | १४०.५० | १४०.५० |
| पारेषण आणि एसएलडीसी देय दर | कोटी रु. | १०१.२७ | २३३.५८ | २७३.१७ | २८६.८३ | ३०१.१७ |
| **एकूण ऊर्जा खरेदी खर्च** | **कोटी रु.** | **३,२३०.५७** | **४०४४.८६** | **३,८११.९२** | **४,०२१.३०** | **४,२३९.८३** |
| **सरासरी ऊर्जा खरेदी दर** | **रुपये/ किलो वॅट** | **४.९७** | **५.५६** | **४.८६** | **४.८६** | **४.८५** |

**२.५.३ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण- वायर व्यवसाय**

नियंत्रण काळातील विविध वर्षांसाठीचा भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालील तक्त्यात दर्शवण्यात आला आहे.

**तक्ता २-५: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण- रिटेल पुरवठा व्यवसाय**

| तपशील | आ.व.२०११-१२ | आ.व.२०१२-१३ | आ.व.२०१३-१४ | आ.व.२०१४-१५ | आ.व.२०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | | ३६.७३ | २७.९० | - | - |
| भांडवलीकरण | १५.१३ | ३६.७३ | २७.९० | - | - |

**२.५.४ समभागातील परतावा**

टाटा पॉवरने समभागावरील परतावा आर्थिक वर्ष २०११-१२ साठी १६ टक्के आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी १७.५० टक्के असल्याचे मोजले आहे. रिटेल पुरवठा व्यवसायात गुंतवणूक केलेल्या समभागांवर हा परतावा असेल. समभागावरील परताव्याचे सखोल मोजमाप आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळ यांच्यासाठी अनुक्रमे **पान क्र.५-८८** आणि **पान क्र.८-१२३** वर देण्यात आली आहे.

**२.५.५ घसारा**

नियमनामध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या दरांवर आधारित एका सरळ रेष पद्धतीनुसार घसाऱ्याचे मोजमाप करण्यात आले आहे. तथापि, एमवायटी नियंत्रण काळासाठी मालमत्तेचा घसारा ७० टक्क्यांपेक्षा जास्त झाला असल्यास उर्वरित घसाऱ्याचे मूल्य उदा. २० टक्के ज्यात आपण नष्टशेषशोधन मूल्य १० टक्केचा विचार मालमत्तांच्या एकूण उपयोगी आयुष्यासाठी वापरला जाणार आहे. दरवर्षी विचार करण्यात येणाऱ्या घसाऱ्याची माहिती **पान क्रमांक ५-८२** आणि **पान क्रमांक ८-१२४** मध्ये देण्यात आली आहे.

**२.५.६ परिकर्म आणि देखभाल खर्च**

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचा ओ ॲण्ड एम खर्च प्रत्यक्षात **पान क्रमांक ५.७८** मध्ये देण्यात आला आहे.

एमवायटी नियंत्रण काळासाठी ओॲण्ड एम खर्चाचा एमवायटी नियमनातील उतारा क्रमांक ९२.७ मध्ये दिल्याप्रमाणे साधारण पद्धतीने दावा करण्यात आला आहे. ओ ॲण्ड खर्चाचे निकर्ष्टाटा पॉवर-डीची ऊर्जा विक्री आणि टाटा पॉवर-डीच्या वायर व्यवसायाच्या ओपनिंग ग्रॉस फिक्स्ड ॲसेट (जीएफए) यांच्याशी जोडण्यात आले आहेत. ओॲण्ड एम खर्चाची सखोल माहिती **पान क्रमांक ८-१२४** मध्ये देण्यात आली आहे.

**२.५.७ दीर्घकालीन कर्जांवर व्याज**

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या कर्जांवरील व्याज ०.११ टक्क्यांवर मोजण्यात आले आहे. कर्जावरील व्याजाची सखोल माहिती पृष्ठ क्रमांक ५.८२ वर देण्यात आली आहे.

एमवायटी नियंत्रण काळासाठी कर्जावरील व्याज एमवायटी नियमनाच्या उतारा क्रमांक ३३ प्रमाणे मोजण्यात आले आहे. दीर्घकालीन कर्जासाठीचा व्याजदर एमवायटी नियंत्रण काळात ११.१७ टक्क्यांवर असून तो आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी लागू करण्यात आला आहे. याशिवाय एमवायटी नियमनाच्यानुसार कर्जांची परतफेड ही त्या वर्षात दावा करण्यात आलेल्या घसाऱ्याइतकीच धरण्यात येणार आहे. दीर्घकालीन कर्जाची माहिती **पान क्रमांक ८-१२३** मध्ये देण्यात आली आहे.

### २.५.८ सुरक्षा ठेवीवरील व्याज

दरवर्षी मे/जूनमधील बिलामध्ये सुरक्षा ठेवींवरील व्याजदराचा विचार केला जात असून त्याचा फायदा ग्राहकांना मे/जूनच्या बिलामध्ये दिला जातो. चलित कर्ज गरजेतून सुरक्षा ठेवीला वगळण्यात आल्यामुळे चलित कर्जावरील व्याजदर हा ग्राहकांना दिलेल्या/देय व्याजाचे मोजमाप वेगळे मोजले जाते.

आर्थिक वर्ष २०११-१२ मधील सुरक्षा ठेवींवरील व्याज प्रत्यक्षात मोजण्यात येणार आहे. याशिवाय एमवायटी नियंत्रण काळासाठी सुरक्षा ठेवींवरील व्याज सध्याच्या रिझर्व्ह बँक दर म्हणजे ९ टक्क्यांनी दिले जाते. एमवायटी नियंत्रण काळासाठी सुरक्षा ठेवींवरील व्याजदराचे मोजमाप **पान क्रमांक ८.१२६** मध्ये देण्यात आले आहे.

### २.५.९ वाईट आणि धोकादायक कर्जांसाठी तरतुदी

वाईट आणि धोकादायक कर्जांसाठीच्या तरतुदी आर्थिक वर्ष २०११-१२ साठी प्रत्यक्षात मोजण्यात आल्या असून एमवायटी नियंत्रण काळासाठी त्या शून्य असल्याचे मानण्यात आले आहे. तथापि टुईंग अपच्या वेळी हे प्रत्यक्ष म्हणून सादर करण्यात येणे आवश्यक आहे.

### २.५.१० आपत्कालीन राखीव साठ्यासाठी योगदान

आपत्कालीन राखीव साठ्यासाठी योगदान हा वैधानिक गरजेचाच एक भाग आहे. दरपत्रक नियमनानुसार आपत्कालीन राखीव साठ्यासाठीचे योगदान ०.२५ टक्के असल्याचे मानले गेले असून ते एकूण स्थिर मालमत्तेच्या दरानुसार आहे. आपत्कालीन राखीव साठ्यासाठीच्या योगदानाची सखोल माहिती आर्थिक वर्ष २०११-१२ साठी **पान क्रमांक ५-९०** आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी **पान क्रमांक ८-१२६** वर देण्यात आली आहे.

### २.५.११ एफएसीवर व्याज

टाटा पॉवर-डी कडून एफएसी एमईआरसीच्या नियम आणि शर्तींच्या अधीन राहून आणि टॅरिफ रेग्युलेशन २००५ नुसार तसेच या संदर्भात माननीय आयोगाने जारी केलेल्या सुधारणांवर आधारित राहून आकारले जाते. एफएएसीची आकारणी दोन महिन्यांच्या कालावधीनंतर केली जात असल्यामुळे अशा कालावधीवर आकारले जाणारे व्याज एफएसीवरील व्याज म्हणून आकारले जाते. एफएसीवरील व्याजाची माहिती पान क्रमांक ५-९२ वर देण्यात आली आहे.

### २.५.१२ नॉन टॅरिफ उत्पन्न

**नॉन टॅरिफ उत्पन्न** हे वितरण परवानाधारकाने अशा कामातून मिळवलेले उत्पन्न आहे ज्या वितरण व्यवसायाला पूर असलेल्या आहेत. उदा. आपत्कालीन साठ्यामधील गुंतवणुकीतून मिळालेले व्याज, नियमित व्यवसातील मालमत्तेतून मिळालेले उत्पन्न, करभरणा इ. वार्षिक महसूल आवश्यकतेतून नॉन टॅरिफ उत्पन्न ग्राहकांवरील बोजा कमी करण्यासाठी वजा केले जाते. नॉन टॅरिफ उत्पन्नाची सखोल माहिती आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी अनुक्रमे **पान क्रमांक ५-९१** आणि **पान क्रमांक ८-१२७**
वर देण्यात आली आहे.

### २.५.१३ अतिरिक्त ऊर्जेच्या विक्रीतून मिळालेले उत्पन्न

निश्चित केलेल्या क्षमतेतून अतिरिक्त ऊर्जा निर्माण झाल्यास टाटा पॉवर डी या अतिरिक्त ऊर्जेची विक्री करते आणि त्यातून मिळालेला महसूल आपल्या ग्राहकांना वार्षिक महसूल गरजेतील वजावट म्हणून देते. आर्थिक वर्ष २०११-१२ साठी या अतिरिक्त ऊर्जेच्या विक्रीतून मिळालेले उत्पन्न प्रत्यक्षात मोजण्यात आले आहे.

### २.५.१४ वित्त कर

आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचा वित्तकर हा माननीय आयोगाने १५ फेब्रुवारी २०१२ रोजी केस क्रमांक १०४/२०११मध्ये दिलेल्या निकालानुसार मोजण्यात येतो. आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या वित्तकराची संपूर्ण माहिती **पान क्रमांक ५.८९** वर देण्यात आली आहे.

एमवायटी नियंत्रण काळासाठीच्या वित्तकराचा परतावा देणे आवश्यक असून तो वेगळा दाखवायचा आहे. तथापि, तो एकूण महसूल गरज आणि व्हीलिंग दरासाठीच्या प्रस्तावर काम करण्यासाठी मोजणे आवश्यक आहे. एमवायटी नियंत्रण काळासाठीचा वित्तकर माननीय आयोगाने आपल्या २६ ऑगस्ट २०१२ रोजी दिलेल्या आदेशांमध्ये अवलंबलेल्या दृष्टिकोनातून आकारण्यात आला आहे.

### २.५.१५ इतर

ऊर्जा संवर्धन आणि लोड शिफ्टिंगसाठी माननीय आयोगाने मान्यता दिलेले मागणी बाजूसाठी टाटा पॉवरकडून व्यवस्थापन पुढाकार घेतले जात आहेत. या उपक्रमांसाठी येणारे खर्च डिमांड साइड मॅनेजमेंट एक्स्पेंसेस म्हणून या ठिकाणी मोजण्यात येणार आहेत. डीएसएम खर्चाची सखोल माहिती **पान क्रमांक ५-९१** आणि **पान क्रमांक ८.१२२** वर अनुक्रमे आर्थिक वर्ष २०११-१२ आणि एमवायटी नियंत्रण काळासाठी देण्यात आली आहे.

### २.५.१६ एकूण महसूल गरज- रिटेल वितरण व्यवसाय

पुरवठा व्यवसायासाठी वार्षिक वितरण गरज खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

**तक्ता २-६ एकूण वितरण आवश्यकता- रिटेल पुरवठा व्यवसाय**

| तपशील | आ.व.२०११-१२ | आ.व.२०१२-१३ | आ.व.२०१३-१४ | आ.व.२०१४-१५ | आ.व.२०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| ऊर्जा खरेदी खर्च | ३,२३४.३२ | ४,०४४.८६ | ३,८११.९२ | ४,०२१.३० | ४,२३९.८३ |
